स्थायी समितीच्या **शनिवार** दिनांक 15–06–2013 रोजी दुपारी 03–00 वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## उपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | श्री.अविनाश निळकंठ ठाकरे | सभापती |
| 2. | डॉ. प्रशांत रसपाल चोपडा | सदस्य |
| 3. | श्री.राजेश श्रावण घोडपागे | सदस्य |
| 4. | सौ.रीता अशोक मुळे | सदस्या |
| 5. | सौ. वंदना विनोद इंगोले | सदस्या |
| 6. | सौ. ठरावा विकास खोब्रागडे | सदस्या |
| 7. | श्री.किशोर चिधुंजी गजभिये | सदस्य |
| 8. | श्री.सुरेश दामोधर तळवेकर | सदस्य |
| 9. | सौ. भावना संतोष लोणारे | सदस्या |
| 10. | श्री. राहुल सुखदेव तेलंग | सदस्य |
| 11. | श्री. देवेंन्द्र महादेव मेहर | सदस्या |
| 12. | श्री. अमान उल्लाह खान व. अब्दुल मजीद खान | सदस्य |

## अनुपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | श्री. पुरूषोत्तम नागोराव हजारे | सदस्य |
| 2. | श्रीमती मिना दिलीप चौधरी | सदस्या |
| 3. | सौ. मायाताई चितांमण इवनाते | सदस्या |
| 4. | सौ. सिमा सुनिल राऊत | सदस्या |

## उपस्थित अधिकारी

1) श्री. हेमंतकुमार पवार, अपर आयुक्त

2) श्री. हरीश दुबे, निगम सचिव

मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

<u>ठराव क्रमांक 71</u> :— नागनदीचे प्रदुषण कमी करण्याच्या दृष्टीने खालील नमुद 9 ठिकाणी '' पैसे द्या व वापरा '' या तत्वावर सार्वजनिक शौचालय निर्माण व संचालनाचे कामास्तव येणाऱ्या रु.9674802 /— च्या खर्चास प्रशासकीय मंजुरी प्रदान करुन हे काम मे. सुलभ इंटरनॅशनल सोशल सर्व्हिस ऑर्गनायझेशन या संस्थेकडुन शासन परिपत्रक व निर्णयातील निकषाच्या अधीन करवुन घेण्यास अनुमती प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन प्रस्तावित विषयास एकमतानाने मंजूरी प्रदान केली, तसेच सुधारीत प्राकलनास स्थायी समितीची मान्यता घेणे आवश्यक राहील असा समितीने एकमताने निर्णय घेतला.

| अ. क्र. | झोन क्र. | प्रस्तावित जागेचे ठिकाण | प्रस्तावित सीट्स | कार्यवाटपाची अंदाजे एकूण रक्कम रु. |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 1 | 2 | रविनगर चौक | 6 | 1138212.00 |
| 2 | 2 | महाराजबाग रोड नाल्याजवळ | 5 | 948510.00 |
| 3 | 3 | सिरसपेठ ग्रेट नाग रोड नागनदीच्या बाजुला | 5 | 948510.00 |
| 4 | 4 | कर्नलबाग, सार्वजनिक संडास | 6 | 1138212.00 |
| 5 | 5 | लभानतांडा, सार्व. शौचालयाची जागा | 6 | 1138212.00 |
| 6 | 5 | जुनी शुक्रवारी, सार्व. शौचालयाची जागा | 5 | 948510.00 |
| 7 | 8 | प्रजापती चौक, नागनदीच्या काठावर | 6 | 1138212.00 |
| 8 | 8 | डम्पींग गेट समोर | 5 | 948510.00 |
| 9 | 10 | राशनिंग ऑफिस समोर वाय.एम.सी.ए. नाल्याजवळ | 7 | 1327914.00 |
| | | एकुण 9 | 51 | 9674802.00 |

<u>ठराव क्रमांक 72</u> :— नागपूर महानगरपालिकेमध्ये जन्म—मृत्यु विभागातील जन्म—मृत्युचे देण्यात येणाऱ्या दाखल्याकरिता आकारण्यात येणारे शुल्क इतर महानगरपालिकेच्या तुलनेत फारच कमी असल्यामुळे या शुल्कामध्ये खालील प्रमाणे शुल्क आकारण्यास मंजूरी प्रदान करण्याचा तसेच बी.पी.एल. कार्ड धारकांना पहिल्या दोन प्रती निःशुल्क देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन ऑन लाईन डिजीटल स्वाक्षरीचा कमीत कमी खर्च किती येतो. याचा विभागाने विस्तृत अहवाल सादर करावा, यासह विषय कार्यालयास परत करण्यास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

1) ऑन लाईन डिजीटल स्वाक्षरीने दाखले रू. 100/— (प्रती प्रत)

2) जन्म—मृत्युचा दाखला रू. 5 प्रती प्रत वरून रू. 50/— (प्रती प्रत)

इतर महानगरपालिकेच्या तुलनेत नागपूर महानगरपालिकेत दाखल्यांचे शुल्क फारच अत्यअल्प आहे. उपरोक्त प्रस्ताव मा. स्थायी समितीने मंजूरी नंतर यास महानगरपालिकेची मंजुरी ध्यावी लागेल.

<u>ठराव क्रमांक 73</u> :— म.न.पा. ठराव क्र. 444, दि. 29.11.2011 अन्वये ज्या उपभोक्त्यांनी या ठरावाचे तारखेपर्यंत नवीन मीटर बसवून घेतलेले आहेत किंवा पुढे बसवून घेणार आहेत. त्यांची दि. 01.04.2009 नंतरची सरासरीने देण्यात आलेल्या देयकांची नवीन मीटरने दाखविलेल्या तीन महिन्याचे वापराचे सरासरीपेक्षा जास्त असल्यास दि. 01.04.2009 नंतर ची देयके नविन मिटरने दाखविलेल्या सरासरी वापरानुसार सुधारीत करुन देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन उपभोक्तांना झालेल्या निर्णयाची प्रसिध्दी करण्यास्तव देयका बरोबर माहिती पत्रक देण्याच्या अटीसह दि. 31.12.2014 पर्यंत मुदत वाढ देण्यात येते व या निर्णयांची योग्य अंमलबजावणी न झाल्यास परत मुदत वाढ देण्यास स्थायी समिती कडे हे अधिकार राखुन ठेवण्यात येते यासह विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

**अध्यक्षः**— वसुल न होण्याजोगे कर निर्लेखित करण्याबाबत म.न.पा. अधिनियमात काय तरतूद आहे. याचे वाचन निगम सचिवाने करावे.

निगम सचिवः— कलम 152 मध्ये "कर निर्लेखित करणे"

आयुक्तास स्थायी समितीच्या मान्यतेने, कोणत्याही कराबद्दल किंवा कोणताही कर वसुल करण्यासाठी झालेल्या खर्चाबद्दल येणे असलेली जी कोणतीही रक्कम त्याच्या मते वसुल होण्याजोगी नसेल ती वेळोवेळी निर्लेखित करता येईल.

**अध्यक्षः**— जर कायद्यात ऐवढी स्वयंस्पष्ट तरतूद आहे तर त्या तरतूदीचा वापर करून कलम 152 खाली जी वसुलीची रक्कम प्रशासनास वसुल होण्याजोगी वाटत नसेल तर असे प्रस्ताव आयुक्तां मार्फत स्थायी समिती समोर कार्यालय कां ठेवत नाही.

**श्री.जाधवः**— जुन्या कायद्यात असे प्रावधान नव्हते.

**अध्यक्षः**— प्रशासनाने असे सर्व प्रस्ताव नियमाप्रमाणे तपासुन कलम 152 अन्वये 15 दिवसाचे आत स्थायी समितीसमोर कर निर्लेखित करण्यासाठी ठेवावे असे ही स्थायी समिती निर्देश देते.

<u>ठराव क्रमांक 74</u> :— सन 2012 च्या महाराष्ट्र अधिनियम क्र. 2 अन्वये महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, 1966 चे कलम 53(8) मध्ये सुधारणा करण्यात आली आहे. कलम 53 मधील सुधारणेनुसार नियोजन प्राधिकरणास राजपत्रातील अधिसुचनेव्दारे कलम 53,54,55 व 56 मधील नियोजन प्राधिकरणाच्या अधिकाराचा वापर करण्याच्या प्रयोजनासाठी '' **पदनिर्देशित अधिकारी** '' नेमण्याची तरतुद करण्यात आलेली आहे. त्यानुसार कलम 53,54,55 साठी उप अभियंता (लोककर्म) व कलम 56 करिता सहाय्यक आयुक्त, क्षेत्रीय कार्यालय, झोन क्र. 1 ते 10 यांना '' **पदनिर्देशित अधिकारी** '' म्हणून अधिकार प्रदान करण्याच्या प्रश्न समितीने विचारात घेऊन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949, आणि नागपूर शहर महानगरपालिका (निरसन) अधिनियम 2011 चे कलम 68 (2) आयुक्तांस, स्थायी समिती च्या मान्यतेने म.न.पा. कायद्या व्यतीरिक्त, कायद्यांखालील महानगरपालिकेच्या अधिकारांचा वापर करण्यास, कर्तव्य किंवा काम करण्यास अधिकार देता येतील. प्रस्तावित प्रकरणात महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम 1966 मधील कलम 53 (8) मध्ये जी सुधारणा

करण्यात आली आहे. ती मार्च 2012 मध्ये झाली आहे व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 (निरसन) कायदा 1 डिसेंबर 2012 ला लागु झाल्यामुळे, महाराष्ट्र महानगरपालिका कायद्याच्या कलम 68 (2) प्रमाणे निर्णय घेणे बंधनकारक आहे. असे स्थायी समितीचे मत आहे.

करीता म.प्रा.नि. व नगरचना अधिनियमांच्या कलम 53, 54, 55, व 56 या कलमांच्या प्रत्यायोजन किंवा विहीत करण्याचा अधिकार व्यतिरीक्त कलम 44, 45, चे अधिकार सुध्दा या प्रस्तावात समाविष्ट करावयास पाहिजे होते असे स्थायी समितीस वाटते. म्हणुन प्रशासनाने म.प्रा.नि. व नगररचना अधिनियमाचे कलम 44, 45, 53, 54, 55 व 56 चा समावेश करुन व या व्यतिरीक्त ज्या कलमाचा वापर करावयाचा अश्या सर्व कलमांचा सर्व समावेशक प्रस्ताव स्थायी समितीसमोर 15 दिवसांच्या आत सादर करण्याचे निर्देश देऊन विषय कार्यालयास परत करण्यास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

तसेच म.न.पा. प्रशासन महापालिाक कायद्या व्यरीक्त जे कुठलेही अन्य कायद्यांच्या कलमाचा वापर करते. अश्या सर्व कायद्यांचे कलम विहीत करण्याचा प्रस्ताव सुध्दा 15 दिवसांचे आत स्थायी समिती समारे सादर करण्याचे निर्देश देते. असा समितीने एकमताने निर्णय घेतला.

<u>ठराव क्रमांक 75</u> :– प्रभाग क्र. 41, येथे गांधी कन्या म.न.पा.शाळेच्या जागेवर स्पोर्टस् कॉम्प्लेक्सचे बांधकामास्तव प्राप्त 5 निविदा पैकी मे. दीप कंस्ट्रक्शन, यांची प्राकलनीय दरापेक्षा 4.07 टक्के कमी दराची रु. 1,46,83,577/– रकमेची निम्नतम निविदा स्विकृत करण्याच्या प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 76</u> :– 1857 प्रथम स्वतंत्रता संग्राम 150 वी वर्षगाठ निमीत्त गांधीबाग बगीचा येथे स्मारक निर्मितीच्या स्थापत्य कामाची प्राकलनीय दरापेक्षा 0.51 टक्के ने कमी असलेली मे. एस.जे.शर्मा यांची रु. 89,56,264/– राशीची निम्नतम निविदेस मंजूरी व कार्यादेश तसेच या कामाकरिता म.न.पा. मध्ये नोंदणीकृत प्रकल्प व्यवस्थापकीय सल्लागार मे. लेट्स बिल्ड यांना मनपा च्या मंजूर दरानुसार रु. 352554/– रक्कमेचा कार्यादेश देण्यास मंजूरीचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 77</u> :– संत गुलाबबाबा प्राथमिक शाळा हंसापुरी येथे अंतर्ग्रही क्रिडा संकुल निर्माण कामाची प्राकलनीय दरापेक्षा 10.66 टक्के ने अधिक असलेली मे. सी. विजय नायडू यांची रु.7184680/– राशीची निम्नतम निविदेस मंजूरी व कार्यादेश तसेच या कामाकरिता म.न.पा. मध्ये नोंदणीकृत प्रकल्प व्यवस्थापकीय सल्लागार मे. कोरान्ने कन्सलटंट यांना मनपा च्या मंजूर दरानुसार रु. 247709/– रक्कमेचा कार्यादेश देण्यास मंजूरीचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 78</u> :– आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

–

निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

सभापती
स्थायी समिती,
महानगरपालिका,नागपूर